# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः24.04.2024** **वारःबुधवार**

1. लोकसभा निवडणूकीच्या दुसऱ्या टप्प्याच्या मतदानासाठी प्रचाराचा आज अंतिम दिवस; सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या सभा
2. निवडणुकांच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत उद्या संपणार; अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारांची लगबग
3. हनुमान जयंती राज्यात उत्साहात साजरी; ज्योतीबाच्या यात्रेसाठी कोल्हापूरातल्या ज्योतिबाच्या डोंगरावर 8 लाख भाविक दाखल आणि,
4. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा

**दूसरा टप्पा**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी प्रचाराची मुदत आज संपत आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या सभांनी कालचा दिवस गाजला. प्रचारसभा, पथ फेऱ्या आणि मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी यांच्या माध्यमातून उमेदवारांनी मतदारांना साकडं घातलं.

भाजपा नेते अमित शहा यांची सभा काल अकोल्यात झाली. भाजपा महायुतीचे अकोल्यातले उमेदवार अनूप धोत्रे यांच्या प्रचारासाठी शहा अकोल्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाला विकासाकडे घेऊन निघाले आहेत. ते तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले तर भारत जगातली तिसऱ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता बनेल, असं शहा यावेळी म्हणाले.

बुलडाण्यात खामगाव इथे महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभा घेतली. खामगाव जालना रेल्वे मार्ग आणि जिगाव जलसिंचन प्रकल्पाचा प्रश्न मार्गी लावल्याची माहिती फडणवीस यांनी यावेळी दिली.

परभणीमध्ये महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांच्या प्रचारासाठी डॉक्टर भागवत कराड यांनी पथफेरीत सहभाग घेतला. आर्थिक संकटात असणाऱ्या शेतकऱ्यांचं कर्ज माफ नं करता केंद्र सरकारनं उद्योगपतींचं कोट्यावधी रुपयांचे कर्ज माफ केलं, अशी टीका कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी काल नांदेडमध्ये केली. कॉंग्रेसचे उमेदवार वसंतराव चव्हाण यांच्या प्रचारार्थ नाळेश्वर इथं पटोले बोलत होते.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी काल रायगड जिल्ह्यात मोर्बा इथं अनंत गीते यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे सुभाष देसाई, शेकापचे जयंत पाटील आदि यावेळी उपस्थित होते.

**चौथाटप्पा**

लोकसभा निवडणुकांच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत उद्या संपणार आहे. 26 एप्रिल रोजी अर्जाची छाननी होईल आणि 29 एप्रिल पर्यंत उमेदवारांना अर्ज मागे घेता येतील. राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांचा या टप्प्यात समावेश असून मतदान 13 मे रोजी होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार निलेश लंके यांनी काल अहमदनगर मतदार संघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांनी अपंग व्यक्तीच्या हस्ते आपला अर्ज दाखल केला. जालना मतदारसंघातून भाजपाचे रावसाहेब दानवे यांनीही आपला उमेदवारी अर्ज काल दाखल केला.

महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ उद्या उमेदवारी अर्ज दाखल करणार असून त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मोहोळ यांच्या समर्थनार्थ सभा होणार आहे. तर महाविकास आघाडीचे पुण्यातले उमेदवार रवींद्र धंगेकर आज पुण्यात पथफेरीच्या माध्यमातून प्रचार करणार आहेत. जळगांव आणि रावेर या दोन्ही लोकसभा मतदार संघात मिळून 9 उमेदवारी अर्ज काल दाखल करण्यात आले.

नंदुरबार लोकसभेसाठी आतापर्यत 7 उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. यात भाजपा उमेदवार डॉ हिना गावित यांनी तर कॉग्रेस उमेदवार गोवाल पाडवी यांनी अर्ज दाखल केला आहे. नंदुरबारमध्ये भारत आदिवासी पार्टी तर्फे रविद्र वळवी निवडणूकीच्या रिंगणात आहेत. आदिवासी युवकांमध्ये भाजपा आणि कॉग्रेस यांच्याबद्दल असलेल्या नाराजीला तिसरा पर्याय म्हणून आपण निवडणूक लढवत असल्याचं वळवी यांनी सांगितलं.

**प्रचार- सांगली, नाशिक**

सांगलीमध्ये बंडखोरी करत अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरलेले विशाल पाटील यांनी काल प्रचाराचा शुभारंभ केला आपण जनतेनं ठरवलेला उमेदवार असून जनता आपल्या पाठीशी असल्याचं पाटील म्हणाले. सांगलीत होणाऱ्या तिरंगी लढतीच्या पार्श्वभूमीवर सर्व पक्षांचा जोरदार प्रचार सुरू असून काल विशाल पाटील यांनी जत तालुक्याचा, भाजपाचे संजय पाटील यांनी तासगाव तालुक्याचा तर महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रहार पाटील यांनी कवठे महांकाळ तालुक्याचा दौरा केला.

वंचित बहुजन आघाडीनं नाशिक लोकसभा मतदारसंघासाठी करण गायकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर दिंडोरी लोकसभा मतदारसंघासाठी मालती थविल यांना उमेदवारी घोषित केली आहे. दरम्यान, महायुतीकडून नाशिक लोकसभा मतदार संघात अद्याप उमेदवार घोषित झालेला नाही. महायुतीमधील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांनी नाशिकच्या जागेवर दावा केला असून तिढा कायम आहे.

या पार्श्वभूमीवर नाशिक लोकसभा मतदारसंघात आपण उमेदवारीच्या शर्यतीत नसल्याचा पुनरुच्चार छगन भुजबळ यांनी केला आहे. महात्मा फुले समता परिषदेच्या वतीनं उमेदवारी साठी प्रयत्न करण्याच्या

विनंतीनंतर भुजबळ यांनी हा खुलासा केला आहे. महायुतीकडे निवडणूक लढवण्यासाठी प्रत्येक पक्षात अनेक उमेदवार आहेत त्यामुळे ज्याला उमेदवारी मिळेल त्याचा प्रचार आपण करू असंही भुजबळ यांनी सांगितलं.

**मतदार टक्केवारी-पुणे, उस्मानाबाद, वाशिम**

पुणे जिल्ह्यात गेल्या लोकसभा निवडणुकीत कमी मतदान झालेल्या ठिकाणी यंदा जिल्हा प्रशासनानं लक्ष केंद्रित केलं आहे. या मतदारसंघातली मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी प्रामुख्यानं नवमतदारांनी मतदान करावं यासाठी महाविद्यालयीन पातळीवर प्रयत्न सुरु आहेत. महिला बचत गट, अंगणवाडी कर्मचाऱ्यांचीदेखील या साठी मदत घेतली जात असून मेट्रोमधूनही मतदानाचं आवाहन केलं जात आहे.

उस्मानाबादमध्ये मतदार जनजागृती कक्षाच्या वतीनं जनजागृती पर सायकल रॅलीचं तसेच पोस्टर प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं होतं त्याशिवाय जिल्ह्यात विद्यार्थ्यांकडून पालकांना पत्र, मानवी साखळी, पथनाट्य यासारख्या उपक्रमातून जनजागृती केली जात आहे. वाशिममध्ये मतदान करणाऱ्यास 26, 27 आणि 28 एप्रिल रोजी बाह्यरुग्ण अर्थात ओपीडी तपासणी मध्ये 50 टक्के सवलत देण्याचा निर्णय इंडियन मेडिकल असोसिएशनकडून घेण्यात आल्याचं आय.एम.ए.चे अध्यक्ष डॉ. संतोष सारडा आणि सचिव डॉ. सोना नेनवानी यांनी कळवलं आहे.

**हनुमान जयंती-अहमदनगर, मुंबई**

हनुमान जयंतीचा उत्सव काल सर्वत्र मोठ्या भक्तीभावानं साजरा झाला. हनुमान मंदिरात पहाटेपासून पूजा-अर्चा, कीर्तन, हनुमान चालीसाचं पठण करण्यात आलं. मुंबईतल्या जुहू चौपाटीवर वाळूशिल्पकार लक्ष्मी गौड यांनी काल 10 फूट उंच हनुमानाची प्रतिकृती बनवली. हनुमान जयंतीच्या निमित्तानं सर्वत्र विविध कार्यक्रम होत असताना अहमदनगर जिल्ह्यातल्या संगमनेर शहरात होणाऱ्या आगळीवेगळ्या हनुमान जयंतीबद्दल ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून.....

**अहमदनगर जिल्ह्यातल्या संगमनेर शहरात महिलांनी हनुमानाचा रथ ओढून हनुमान जयंती साजरी करण्याची अनोखी परंपरा आहे. सन 1929 मध्ये पारतंत्र्याच्या काळात ब्रिटिश सरकारनं पुरुषांना रथ यात्रा काढण्यास मनाई करत हनुमान जयंती साजरी करायला परवानगी नाकारली. त्यावेळी झुंबरबाई अवसर या महिलेनं पुढाकार घेतला आणि महिलांनी रथ ओढून रथयात्रा काढण्यात आली. ही घटना नंतर इथली परंपरा झाली. आणि गेली 95 वर्षं हनुमान जयंतीला इथल्या महिला रथ ओढतात आणि रथोत्सव साजरा केला जातो. कालही महिलांनी रथ ओढला आणि हनुमानजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. आकाशवाणी बातम्यांसाठी आमचे अहमदनगरचे वार्ताहर मनोज सातपुते यांच्यासह मेघना देशपांडे पुणे.**

**ज्योतिबा-कोल्हापूर**

कोल्हापूर जिल्ह्यातल्या श्रीज्योतिबाची यात्रा उत्साहात साजरी झाली. उंचच्या उंच सासनकाठ्या नाचवून आणि गुलाल खोबऱ्याची उधळण करत भाविकांनी 'जोतिबाच्या नावानं चांगभलं' चा गजर केला. जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते साताऱ्यातल्या पाडळी निनाम इथल्या मानाच्या सासन काठीचं पूजन करण्यात आलं. नंतर ससाण काठ्यांची मिरवणूक मोठ्या दिमाखात पार पडली. ज्योतिबा यात्रेसाठी सुमारे आठ लाख भाविक डोंगरावर असल्याची शक्यता जिल्हा प्रशासनाकडून वर्तवण्यात आली आहे.

**<u>यात्रा-धाराशिव</u>**

राज्यातल्या साडेतीन शक्तिपीठांपैकी आद्य पूर्ण पीठ असलेल्या तुळजापूरच्या तुळजाभवानी मातेच्या यात्रेला काल चैत्र पौर्णिमेच्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. कराडनगरीचं ग्रामदैवत श्री कृष्णाबाईच्या चैत्री यात्रा महोत्सवालाही काल पालखी मिरवणुकीने प्रारंभ झाला. सहा दिवस चालणाऱ्या यात्रेदरम्यान पूजाअर्चा, धार्मिक तसंच मनोरंजनात्मक कार्यक्रम होणार आहेत.

**<u>सामंजस्य करार-सोलापूर</u>**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातले वाणिज्य आणि व्यवस्थापन संकुल; आणि नवी दिल्लीतली भारतीय सचिव संस्था यांच्यामध्ये काल कौशल्य विकास विषयक अभ्यासक्रमांसाठी सामंजस्य करार करण्यात आला. पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पीएचडीच्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे उपक्रम आणि कौशल्यभिमुख ज्ञान देण्यासाठी हा करार झाला आहे. वेगवेगळ्या अभ्यासक्रमांशी निगडित नाविन्यपूर्ण आणि कौशल्य विकास करणारे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी अशा संस्थांशी करार करण्यात येत असल्याचं कुलगुरू प्रकाश महानवर यांनी सांगितलं.

**<u>फाली-जळगाव</u>**

'फ्युचर ॲग्रिकल्चर लीडर्स ऑफ इंडिया' या अधिवेशनला जळगावमध्ये सुरवात झाली आहे. भारतीय शेती आणि कृषी-उद्योगाचे भविष्य बदलणाऱ्या शेतकऱ्यांच्या या अधिवेशनात शेतकऱ्यांनी आपले अनुभव सांगत भविष्यातल्या शेतीविषयी मार्गदर्शन केलं. उपक्रमाच्या या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्र, आणि मध्यप्रदेशातले 400 विद्यार्थी आणि 50 शिक्षक सहभागी झाले होते.

**<u>हवामान</u>**

मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात आज आणि उद्या तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भासाठी हाच इशारा सत्तावीस तारखेपर्यंत दिला आहे. कोकणात हवामान उष्ण, आर्द्र राहील.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार